महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१
दूरध्वनीक्र. ०२०-२६१२ २०७६
Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in
ddtpho_pune@rediffmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## कार्यालयीन आदेश

विषय :- संचालनालयाच्या आस्थापनेवरील स्वीय सहायक, प्रथम लिपीक, कनिष्ठ लिपीक, रेखाकला व वाहनचालक संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना तीन लाभाच्या सुधारित सेवांतर्गत आश्वारित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करणेबाबत.

संदर्भ:-
१. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-१०९५ /प्र.क्र.१/ ९५/ बारा, दिनांक ८ जून १९९५.
२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २० जुलै २००१.
३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३, दिनांक ११ जानेवारी २००२.
४. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/ सेवा ३, दिनांक १ एप्रिल २०१०.
५. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा ३, दिनांक ५ जुलै २०१०.
६. शासन, वित्त विभाग परिपत्रक क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३, दि.१९/०१/२०१३.
७. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.६ सप्टेंबर, २०१४.
८. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.मप्रन्या-२०१२/प्र.क्र.६९/२०१२ /सेवा-३, दि.७ ऑक्टोबर, २०१६.
९. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९ /सेवा-३, दि.०२ मार्च, २०१९.
१०. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-१११९/प्र.क्र.०३/२०१९/सेवा-३, दिनांक ७ ऑक्टोबर २०२२.

संदर्भ (१) दिनांक ८ जून, १९९५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंमलात आलेली गट-क व गट-ड (वर्ग-३ व वर्ग-४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची कालबद्ध पदोन्नती योजना संदर्भ (२) दिनांक २० जुलै, २००१ रोजीच्या शासन

निर्णयान्वये वंद करण्यात आली असून, त्याऐवजी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शासनाने लागू केली आहे. ही योजना पाचव्या वेतन आयोगानुसार रु.८०००-२७५-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना लागू करण्यात आली आहे. संदर्भ (३) दिनांक ११ जानेवारी, २००२ च्या शासन निर्णयान्वये, या योजनेचा लाभ अनुज्ञेय असलेल्या गट-अ मधील राजपत्रित तसेच गट-ब मधील राजपत्रित व अराजपत्रित अधिकारी / कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मंजूर करण्याचे अधिकार राज्यस्तरीय विभागप्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत.

संदर्भ क्र.(२) दि.२० जुलै, २००१ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र.(४) शासन निर्णय दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, सुधारित स्वरुपात यापुढे **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना या नावाने दि.१ ऑक्टोवर, २००६ पासून अंमलात आली आहे.** ही योजना कमाल वेतनवँड पीवी-३ (रु.१५६००-३९१००) + ५४००/- ग्रेड पे. घेणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना इतर अटी व शर्तीचे अधिन राहून सदर लाभ अनुज्ञेय केलेला आहे.

संदर्भ क्र.(४) दि.०१ एप्रिल, २०१० अन्वये, कार्यान्वित असलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र.(५) शासन निर्णय दि.०५ जुलै, २०१० अन्वये, शासनामधील पदोन्नतीची संधी नसलेल्या तसेच एकाकी पदांना दि.०१ ऑक्टोबर, २००६ पासून लागू करण्यात आली आहे. तसेच सदरहु सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कमाल वेतनबँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + रु.५४०० पर्यंत ग्रेडवेतन घेणाऱ्या एकाकी पदांवरील कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आली असून या योजनेखाली पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीत कमाल दोन वेळा वेतन संरचना मंजूर करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

संदर्भ क्र.(६) दि.१९/०१/२०१३ अन्वये, नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची तत्पूर्वीची समकक्ष पदावरील नियमित सेवा कालबध्द पदोन्नती /आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरण्यावावत शासनाने आदेश निर्गमित केले आहेत.

संदर्भ क्र.(७) दि.०६/०९/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये, पदोन्नतीच्या संधी नसलेल्या एकाकी पदांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

संदर्भ क्र. (८) दि.०७/१०/२०१६ अन्वये, कालबध्द पदोन्नती/ सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना/ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी तात्पुरती नियमित/अखंडीत सेवा देखील विचारात घेणेवावत शासनाने आदेश निर्गमित केले आहेत.

E:\Vishor\final_10_20_30\DPC clerk\बैठक टिपणी-Sr. Clerk, Jr. Clerk & Driver timebound order

संदर्भ क्र.(९) दि.०२ मार्च, २०१९ अन्वये शासनाने सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अनुज्ञेय केली आहे. सातव्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये १०, २० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतरची, तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाही **दि.०१/०१/२०१६ पासून अंमलात आली आहे.** वाहनचालक या संवर्गातील पदे एकाकी असल्याने एकाकी अथवा एकाकी संवर्गातील कर्मचारी, यांना दि.०१/०१/२०१६ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत यथास्थिती १२ वा २४ वर्षाच्या सेवेनंतर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर झाला आहे, त्यांना २० (१२+८) व ३० (२४+६) एवढया वर्षाच्या सेवेनंतर पात्रतेनुसार यथास्थिती दुसरा वा तिसरा लाभ सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार वेतन मॅट्रीक्समधील नजिकच्या वेतन स्तरामध्ये (Immediate Next Level) मंजूर करावयाचा आहे.

संदर्भ क्र.१० अन्वये सातव्या वेतन आयोगामध्ये, तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेबाबतच्या शासन निर्णयात अंशतः सुधारणा करणेत आली आहे.

उपरोक्त सर्व शासन निर्णय विचारात घेऊन तसेच दिनांक ०२ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागातील **स्वीय सहायक, लिपिक व वाहनचालक** या संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला/ दुसरा/ तिसरा लाभ मंजूर करण्याबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

०१. **स्वीय सहायक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ.**

अ) सातव्या वेतन आयोगानुसार स्वीय सहायक या पदाची विद्यमान वेतनश्रेणी एस-१६ (४४९००-१४२४००)

ब) सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ अनुज्ञेय केल्यानंतर स्वीय सहायक पदास अनुज्ञेय होणारी पुढील वेतनश्रेणी एस-१७, (४७६००-१५११००)

| अ. क्र. | अधिका-याचे नांव | जातीचा प्रवर्ग / जाती दावा वैध/अवैध | स्वीय सहायक पदावर नियुक्ती दिनांक | सु.से.आ.प्र.योचा पहिला लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीमती रंजना रणजित ओतारी | भ.ज.ब. (वैध) | १७/०८/२०१३ | १७/०८/२०२३ | --- |

०२. **प्रथम लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा तीसरा लाभ.**

अ) सातव्या वेतन आयोगानुसार प्रथम लिपीक पदाची विद्यमान वेतनश्रेणी एस-१३ (३५४००-११२४००)

ब) सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा तीसरा लाभ अनुज्ञेय केल्यानंतर अनुज्ञेय होणारी अधिक्षक पदाची वेतनश्रेणी एस-१४ (३८६००-१२२८००).

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव | जातीचा प्रवर्ग/ जाती दावा वैध /अवैध | नियुक्तीचा दिनांक | सु.से.आ.प्र. योचा पहिला लाभ मंजूर करण्यात आल्याचा दिनांक | सु.से.आ.प्र योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्यात आल्याचा दिनांक | सु.से.आ.प्र. योजनेचा तीसरा लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | श्री.संभाजी नामदेव टिळेकर | इ.मा.व. (वैध) | १५/७/१९९३ | १५/७/२००५ | १/१/२०१६ | १५/७/२०२३ | --- |
| २ | श्रीमती माधुरी मोहन जामखेडकर | खुला | १५/७/१९९३ | १५/७/२००५ | १/१/२०१६ | १५/७/२०२३ | --- |
| ३ | श्रीमती संगिता अशोक कांबळे | अ.जा. (वैध) | १०/१/१९९४ | १०/१/२००६ | १/१/२०१६ | १०/१/२०२४ | --- |

०३. **कनिष्ठ लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ.**

अ) सातव्या वेतन आयोगानुसार कनिष्ठ लिपिक पदाची विद्यमान वेतनश्रेणी एस-६ (१९९००-६३२००)

ब) सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजूर केल्यानंतर अनुज्ञेय होणारी वरिष्ठ लिपिक पदाची वेतनश्रेणी एस-८(२५५००-८११००)

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व सध्याचे पदनाम | जातीचा प्रवर्ग/ जातीदावा वैध/अवैध | क.लि.पदावर नियुक्तीचा दिनांक | सु.से.आ.प्र. योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.रमेश नामदेवराव राऊत, वरिष्ठ लिपीक | इमाव (वैध) | १३/०३/२०१३ | १३/०३/२०२३ | --- |
| २ | श्री.माधव शिवराम राजूरे, वरिष्ठ लिपीक | भ.ज.क. (वैध) | १५/०४/२०१३ | १५/०४/२०२३ | --- |
| ३ | श्री.विलास पांडुरंग म्हामूनकर, वरिष्ठ लिपीक | खुला | १६/०४/२०१३ | १६/०४/२०२३ | --- |

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व सध्याचे पदनाम | जातीचा प्रवर्ग/ जातीदावा वैध/अवैध | क.लि.पदावर नियुक्तीचा दिनांक | सु.से.आ.प्र. योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ४ | श्रीमती रसिका रविंद्र पाटेकर, वरिष्ठ लिपीक | खुला | १५/०४/२०१३ | १५/०४/२०२३ | --- |
| ५ | श्री.विशाल भिकाजी रामगुडे, वरिष्ठ लिपीक | इ.मा.व. (वैध) | १८/०४/२०१३ | १८/०४/२०२३ | --- |
| ६ | श्री.अरिंजय श्रीरंग कनकधर, वरिष्ठ लिपीक | भ.ज.क. (वैध) | ०३/०६/२०१३ | ०३/०६/२०२३ | --- |
| ७ | श्रीमती सारिका मधुकर मंडले, वरिष्ठ लिपीक | वि.जा.अ. (वैध) | ०३/०६/२०१३ | ०३/०६/२०२३ | --- |
| ८ | श्रीमती दिपाली गजानन साळवी, वरिष्ठ लिपीक | खुला | ०३/०६/२०१३ | ०३/०६/२०२३ | --- |
| ९ | श्री.रवेश धोंडिराम जगरवाल, कनिष्ठ लिपीक | वि.जा.अ. (वैध) | १७/०६/२०१३ | १७/०६/२०२३ | दि.१७/०६/२०२३ रोजी पहिला लाभ अनुज्ञेय करून. दि.०३/०७/२०२३ रोजी वरिष्ठ लिपीक पदावरील पदोन्नती नाकारली असल्याने सदरचा लाभ दि.०३/०७/२०२३ पासून काढून घेण्यात यावा. |
| १० | श्री.दत्तात्रय रामराव बेटकर, कनिष्ठ लिपीक | खुला | २२/०४/२०१३ | २२/०४/२०२३ | दि.२२/०४/२०२३ रोजी पहिला लाभ अनुज्ञेय करून. दि.०३/०७/२०२३ रोजी वरिष्ठ लिपीक पदावरील पदोन्नती नाकारली असल्याने सदरचा लाभ दि.०३/०७/२०२३ पासून काढून घेण्यात यावा. |

४) **वाहनचालक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वारित प्रगती योजनेचा पहिला लाभ (एकाकी पद).**

अ) सातव्या वेतन आयोगानुसार वाहनचालक पदाची विद्यमान वेतन संरचना एस-६.(१९९००-६३२००).

ब) सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजूर केल्यानंतर सदर पद एकाकी असल्याने दि.०२/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टामधील अ.क्र.(६) नुसार वेतनमॅट्रीक्स एस-७, (२१७००-६९१००) अनुज्ञेय होत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | जातीचा प्रवर्ग/जाती दावा वैध/अवैध | खात्यात प्रवेश केल्याचा दिनांक | सु.से.आ.प्र. योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.चंद्रकांत तात्याबा राजे | इ.मा.व. (वैध) | ०१/०४/२०१३ | ०१/०४/२०२३ | --- |
| २ | श्री.ठकसेन तानाजी ठोंबरे | भ.ज.क (वैध) | ०६/०६/२०१३ | ०६/०६/२०२३ | --- |
| ३ | श्री.उमेश मुकुंद आगिवले | इ.मा.व. (वैध) | ०१/०२/२०१४ | ०१/०२/२०२४ | --- |

५) **वरील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व तिसरा लाभ पुढील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.**

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.११(१) खालील पदोन्नतीच्या पदाच्या वेतन श्रेणीतील वेतन निश्चितीसाठी द्यावयाचा विकल्प अनुज्ञेय आहे. त्यांनी तसा विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. त्यानंतर आलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही, आणि त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.११(१) (ए) नुसार केली जाईल.

२. जे कर्मचारी सद्यस्थितीत प्रतिनियुक्तीवर आहेत; त्यांच्या बाबतीत ते प्रतिनियुक्ती वर जाण्यापूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होते/ ज्या जिल्हयात कार्यरत होते, त्या शाखा कार्यालयाने त्यांना वरील योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करावी.

३. जे कर्मचारी या आदेशाच्या दिनांकास सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांच्याबाबत ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत त्या कार्यालयाने त्यांना वरील योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करावी. तसेच जे अधिकारी/ कर्मचारी प्रतिनियुक्तीने कार्यरत असताना सेवानिवृत्त झाले आहेत, अशा अधिकाऱ्यांची वेतननिश्चिती संबंधित विभागीय कार्यालयाने करावी व ज्या कार्यालयाने सदर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना निवृत्तीवेतन विषयक लाभ मंजूर करुन अदा केले आहेत; त्या कार्यालयाने/ आहरण व संवितरण अधिकाऱ्याने या आदेशानुसार संबंधितांस लाभाची रक्कम अदा करण्याबाबत विभागीय कार्यालयाच्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

४. वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतननिश्चितीत मिळालेला लाभ हा त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (functional) पदोन्नती /मिळाल्यानंतर पुन्हा देय होणार नाही. या योजनेअंतर्गत पदोन्नत पदाची वेतनश्रेणी मिळाली तरी उपरोक्त कर्मचारी यांची नावे (मूळ) कनिष्ठ संवर्गाच्या जेष्ठता सूचीतच राहतील.

५. उपरोक्त कर्मचारी यांना भविष्यात पदोन्नती दिल्यानंतर जर त्यांनी पदोन्नती नाकारली किंवा ते नियमित पदोन्नतीस अपात्र ठरले तर, पदोन्नती नाकारल्याच्या दिनांकापासून किंवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरल्याच्या दिनांकापासून त्यांना या योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ काढून घेण्यात येईल. मात्र, त्यापूर्वी देण्यात आलेल्या आर्थिक लाभाची वसुली करण्यात येणार नाही.

६. शासन निर्णय दि.१ जुलै, २०११ सोबतचे परिशिष्ट-अ मधील मुद्दा क्र.१३ मधील स्पष्टीकरण विचारात घेता, सदर कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त असल्याने त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा आर्थिक लाभ मंजूर करण्यात येत आहे.

७. या आदेशान्वये मंजूर करण्यात येत असलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाची नोंद संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

(मसुदा मा.संचालक,नगर रचना यांनी मंजूर केला असे)

१९/०६/२०२४

जा.क्र.आस्था/सुसेआप्रयो/गट-अ,क/ प्रशा-१/ ३१७३
मध्यवर्ती कार्यालये, पुणे - ४११ ००१
दिनांक - १९/०६/२०२४.

o/c (वि.ल.वाघमोडे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरीता

१९/६/२०२४

**प्रत :** मा.अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, नवि-२७/नवि-३, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

**प्रत :** मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

**प्रत :** मा.महालेखापाल, मुंबई-१ / नागपूर-२.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१) सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन / अंमलबजावणी कक्ष, पुणे / पुणे विभाग/ कोकण विभाग/ नाशिक विभाग/ औरंगाबाद विभाग/ अमरावती विभाग / नागपूर विभाग.
२) उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर महानगरपालिका.
३) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मुल्यांकन मुंबई/ नाटक्षुत परिषद पुणे.
४) सहायक संचालक, नगर रचना, सातारा /जालना/ नांदेड /ठाणे / प्रादेशिक योजना, रत्नागिरी/
५) सहायक संचालक, नगर रचना, मुंबई शहर भूमापन व भूमि अभिलेख, मुंबई तथा भूमि संपादन विशेष अधिकारी, क्र.१, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
६) कोषागार अधिकारी, -------------------
७) कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, प्रशा-१३/प्रशा-१ ब/ प्रशा-२/ लेखा / अर्थसंकल्प.

E:\kishor\final_१० _२०_३०\DPC clerk\बैठक टिपणी Sr. Clerk, Jr. Clerk & Driver timebound order

८) श्री.पालकर, स्वी.स./श्रीमती दाभाडे, उ.श्रे.ल.ले.

९) कार्यासन अधिकारी, टिपीव्ही-७, मुख्य कार्यालय, पुणे.

//- प्रस्तुत आदेश संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात यावेत.

१०) वैयक्तिक धारिका

११) श्री.जाधवर, व.लि. प्रस्तुत आदेशामध्ये देण्यात आलेल्या सु.से.आ.प्र.योजनेच्या लाभाची नोंद ज्येष्ठता सूचीमध्ये घेण्यात यावी.

**प्रत विहित मार्गाने रवाना.**

१२) श्रीमती रंजना रणजित ओतारी, स्वीय सहायक, (सहसंचालक, नगर रचना, मुल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालय)

१३) श्री.संभाजी नामदेव टिळेकर, प्रथम लिपीक, मुख्य कार्यालय, पुणे

१४) श्रीमती माधुरी मोहन जामखेडकर, प्रथम लिपीक, मुख्य कार्यालय, पुणे

१५) श्रीमती संगिता अशोक कांबळे, प्रथम लिपीक (सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई)

१६) श्री.रमेश नामदेवराव राऊत, वरिष्ठ लिपीक, (उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर महानगरपालिका कार्यालय)

१७) श्री.माधव शिवराम राजूरे, वरिष्ठ लिपीक (सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई)

१८) श्री.विलास पांडुरंग म्हामूनकर, वरिष्ठ लिपीक (सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई)

१९) श्रीमती रसिका रविंद्र पाटेकर, वरिष्ठ लिपीक, (सहायक संचालक, नगर रचना, प्रादेशिक योजना, रत्नागिरी कार्यालय)

२०) श्री.विशाल भिकाजी रामगुडे, वरिष्ठ लिपीक, (उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मुल्यांकन, मुंबई कार्यालय)

२१) श्री.अरिंजय श्रीरंग कनकधर, वरिष्ठ लिपीक (सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा)

२२) श्रीमती सारिका मधुकर मंडले, वरिष्ठ लिपीक, मुख्य कार्यालय, पुणे.

२३) श्रीमती दिपाली गजानन साळवी, वरिष्ठ लिपीक (सहायक संचालक, नगर रचना, मुंबई शहर भूमापन व भूमि अभिलेख, मुंबई तथा भूमि संपादन विशेष अधिकारी, क्र.१, मुंबई शहर व मुंबई उपनगर कार्यालय)

२४) श्री.रवेश धोंडिराम जगरवाल, कनिष्ठ लिपीक (सहायक संचालक, नगर रचना, जालना शाखा, जालना)

२५) श्री.दत्तात्रय रामराव बेटकर, कनिष्ठ लिपीक, (सहायक संचालक, नगर रचना, नांदेड शाखा, नांदेड)

२६) श्री.चंद्रकांत तात्याबा राजे, वाहनचालक (सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई)

२७) श्री.ठकसेन तानाजी ठोंबरे, वाहनचालक, ~~मुख्य कार्यालय, पुणे~~ (वाहतुक व परिवहन, पुणे)

२८) श्री.उमेश मुकुंद आगिवले, वाहनचालक, (सहायक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे)